DAY —— 09 SEAT NUMBER

| 2024 | VII | 26 | 1100 | J-187 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# ORGANISATION OF COMMERCE AND MANAGEMENT (51)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(३) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.*

*(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.*

**प्र.१. (अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५)[२०]

(१) उत्पादनाच्या विविध बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी एफ. डब्ल्यू. टेलर यांनी एकूण ----- फोरमन सांगितले.

(अ) आठ

(ब) तीन

(क) दोन

(२) बँका अधिविकर्ष सवलत ------- खातेधारकांना उपलब्ध करून देतात.

(अ) बचत

(ब) चालू

(क) मुदत ठेव

(३) ऑनलाईन व्यवहार करण्यास ------ आवश्यक असते.

(अ) व्यवसाय

(ब) व्यापार

(क) नोंदणी

(४) व्यवसाय संघटनांनी ------ आरोग्याचे रक्षण करावे व सुरक्षिततेची साधने पुरवावीत.

(अ) मालकांच्या

(ब) कर्मचाऱ्यांच्या

(क) गुंतवणुकदारांच्या

(५) जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष ------- असतात.

(अ) जिल्हा न्यायाधीश

(ब) उच्च न्यायालय न्यायाधीश

(क) सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश

**(ब)** योग्य जोड्या जुळवा : (५)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) निर्देशन | (१) एकच विक्रेता |
| (ब) गोदाम (Warehousing) | (२) एक प्रक्रिया ज्यात भरती, निवड, रुजू होणे व मोबदला ठरविला जातो. |
| (क) बाह्यसेवा | (३) कर्जफेडीची क्षमता व प्रतिष्ठा |

| | |
|---|---|
| (ड) गुंतवणुकदारांप्रति जबाबदारी | (४) रस्ते वाहतूक कार्यालय (RTO) |
| (इ) मक्तेदारी | (५) समय उपयोगिता |
| | (६) समाजाची सेवा करणे |
| | (७) अनेक विक्रेते |
| | (८) स्थळ उपयोगिता |
| | (९) एक प्रक्रिया, जी सूचना, मार्गदर्शन, संवाद आणि प्रेरणा देते |
| | (१०) व्यवसाय प्रक्रिया बाह्यसेवा (BPO) |

**(क)** गटात ना बसणारा शब्द शोधा : (५)

(१) निवड, प्रशिक्षण, समन्वय, नियुक्ती

(२) B2B, B2C, A2Z, C2C

(३) इंडोमेंट विमा पॉलिसी, संपूर्ण जीवन विमा, पैसे परतावा योजना, सर्वसमावेशक विमापत्र

(४) जिल्हा आयोग, राज्य आयोग, अशासकीय संस्था (NGO), राष्ट्रीय आयोग

(५) प्राथमिक बाजार, द्वितीय बाजार, किरकोळ बाजार, मुदत बाजार

**(ड)** खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) संघटनात्मक कार्य सुरळीत होण्यासाठी सहकार्याची आवश्यकता नसते.

(२) व्यावसायिक हे समाजाचे विश्वस्त असतात.

(३) व्यवसायाच्या विस्तारासाठी व्यावसायिक सेवा महत्त्वाच्या असतात.

(४) ग्राहक संरक्षण कायदा उत्पादकांस संरक्षण देतो.

(५) विपणी (Market) हा शब्द ग्रीक भाषेतील 'मार्केट्स' शब्दापासून आलेला आहे.

**प्र.२. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) :** **[८]**

(१) घाऊक बाजारपेठ

(२) परमोच्च विश्वासाचे तत्त्व

(३) परिवेष्टन / संवेष्टन व लेबलिंग

(४) जनहित याचिका

(५) अधिकार साखळीचे तत्त्व

(६) सेवा

**प्र.३. खालील घटना किंवा प्रसंगाचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणतेही दोन) :** **[६]**

(१) श्री संजय हे व्यावसायिक आहेत. त्यांचे पुणे आणि नाशिक येथे कारखाने आहेत. श्री संजय हे कुटुंबासह पुण्यामध्ये स्थायिक असून त्यांना ५ आणि ८ वर्षे वयाच्या दोन मुली आहेत.

(i) श्री संजय हे त्यांच्या पत्नी व मुलींसाठी जीवनविमा घेऊ शकतात का?

(ii) श्री संजय हे त्यांच्या कारखान्यासाठी सागरी विमा घेऊ शकतात का?

(iii) आगीमुळे कारखान्याच्या होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईसाठी श्री संजय कोणत्या प्रकारचा विमा घेऊ शकतात?

(२) श्री जय www.flipkart.com या वेबसाईटवरून काही भेटवस्तू ऑनलाईन खरेदी करतात. त्याच वेळी शीतल e-bay या वेबसाईटवरून भेटवस्तू खरेदी करतात. तर हा व्यवहार ओळखा.

(i) C2C सोबत संबंधित वेबसाईट कोणती?

(ii) B2C सोबत संबंधित वेबसाईट कोणती?

(iii) श्री जय यांनी ऑनलाईन व्यवहार करताना कोणती पहिली अवस्था अनुकरण करावी?

(३) यशवंत कंपनी लि. आपल्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या लहान बालकांसाठी पाळणाघर व घरी थांबूनच काम करण्याची सवलत देते. जरी ते कामगार संघटनांचे सभासद असले तरी, व्यवस्थापन निर्णय घेण्यापूर्वी, त्यांच्या सूचनांची दखल घेते.

(i) या पद्धतीचे काम करून ते कोणत्या घटकांविषयी सामाजिक जबाबदारी पार पाडतात?

(ii) ते कोणती मूल्ये निर्देशित करतात?

(iii) वरील घटनेमध्ये मालक, कोणत्या प्रकारच्या जबाबदारीचे अनुसरण करतात?

**प्र.४. खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) :** **[१२]**

(१) राज्य आयोग आणि राष्ट्रीय आयोग

(२) मध्यवर्ती बँक आणि व्यावसायिक बँक

(३) संघटन आणि कर्मचारी व्यवस्थापन

(४) व्यवसाय प्रक्रिया बाह्यसेवा (BPO) आणि ज्ञान प्रक्रिया बाह्यसेवा (KPO)

**प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही <u>दोन</u>) :** **[८]**

(१) विपणनाचे समाजासाठी असणारे महत्त्व स्पष्ट करणारे कोणतेही चार मुद्दे स्पष्ट करा.

(२) ग्राहकांचे कोणतेही चार अधिकार स्पष्ट करा.

(३) व्यवसायाच्या शासनाप्रति कोणत्याही चार जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

**प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही <u>दोन</u>) :** **[८]**

(१) समानतेचे तत्त्व महत्त्वाचे आहे.

(२) ग्राहक संरक्षण कायदा ग्राहक हितासाठी संमत करण्यात आला आहे.

(३) विपणी म्हणजे व्यवसायिकांचे व्यवहार चालणारी जागा.

(४) हवाई वाहतूक हा वाहतुकीचा सर्वात जलद प्रकार आहे.

**प्र.७. खालील प्रश्नांचे उत्तर लिहा (कोणतेही <u>दोन</u>) :** **[१०]**

(१) ग्राहकांसाठी विपणनाचे असणारे महत्त्व स्पष्ट करा.

(२) उद्योजकाची कोणतीही पाच कार्ये स्पष्ट करा.

(३) शास्त्रीय व्यवस्थापनाची तत्वे स्पष्ट करा.

**प्र.८.** गोदाम म्हणजे काय? गोदामांचे विविध प्रकार स्पष्ट करा. **[८]**

**किंवा**

नियोजनाची व्याख्या सांगून नियोजनाचे महत्त्व स्पष्ट करा.

◆◆◆